# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/05/2023 (मंगळवार) सकाळ


---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०४ कि.मी अंतरावर पिरावा शिवार येथे दिनांक १५/०५/२०२३ चे ०७.०० वा. ते १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– गणेश तुकाराम काळसर्पे, वय ३५ वर्ष, रा. खापरी पोस्ट डव्हा ता. उमरेड जि. नागपुर व मृतक नामे– तुकाराम धोंडबा काळसर्पे, वय ७० वर्ष रा. खापरी पोस्ट डव्हा ता. उमरेड जि. नागपुर हे मुलगा व वडील असुन एक अनोळखी ईसम वय अंदाजे २५ ते ३० वर्ष हा मृतकाचे शेतातील गोठयात दोन ते तीन आठवडयापुर्वी तसेच घटने रोजी आल्याने फिर्यादी आरोपीस चेहऱ्याने ओळखतो. तसेच यातील आरोपी अनोळखी ईसम याने अज्ञात कारणावरून मृतकास त्याचे खापरी शिवारातील शेतामधील जनावरांच्या गोठयातून घटनास्थळी पिरावा शिवारात मोटरसायकलने नेवुन मृतकाचे पांढऱ्या रंगाच्या लाल झरी असलेल्या कापडी दुपट्टयाने गळा घट्ट आवळुन जिवाने ठार मारले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रवींद्र वाघ पोस्टे उमरेड मो. क्र. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत २२ कि.मी अंतरावर मौजा महारकुंड शिवार येथे दिनांक १४/०५/२०२३ चे १९/०० वा. दरम्यान यातील महारकूंड ता. सावनेर येथील ॲडव्होकेट नितीन वैद्य यांचे शेतात फिर्यादी नामे– निखील संजय भांडेकर वय २७ वर्ष रा. वार्ड क्र २ येडाखेडी ता सेलु जि. वर्धा हे हजर असतांना जखमी मित्र नामे – राजन दिपक चौरासे, वय २१ वर्ष रा. बोकारा व आरोपी नामे– पुरूषोत्तम लेखराम कुदावळे, वय ६० वर्ष रा. बोखारा हे एकमेकांशी मजाक करीत असतांना एकमेकांशी भांडण करून भांडणामध्ये जखमी राजन दिपक चौरासे याने आरोपीस गालावर थापड मारल्याने आरोपीला राग आल्याने त्याने बाजूला असलेली लाकडी काठी उचलून ‘‘तुला आता खतम करतो’’ असे बोलून दोन्ही हाताने काठीने जिवंत ठार मारण्याच्या उद्देशाने जखमी राजन दिपक चौरासे याचे डोक्यावर मारून त्याला गंभीर जखमी करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन खापा मो. नं. ८३२९१३०४५८ हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील श्रीकृष्ण मंगल कार्यालय सावनेर येथे दिनांक १५/०५/२०२३ चे १६/३० वा. ते १६/४० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. पुष्पा ज्ञानेश्वर चौधरी, वय ४३ वर्ष रा. कुसुंबी (गडमी) ता. सावनेर यांच्या मुलीचा लग्न सोहळा श्रीकृष्ण मंगल कार्यालय सावनेर येथे असल्याने ती आली होती तिचे जवळ लग्नाचे खर्चा करीता एका सिमेंट रंगाच्या हॅन्ड बॅग मध्ये १,५०,०००/— रू. ठेवलेले होते नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही वधु मुलीचे रूम मध्ये ठेवुन लागुन असलेल्या बाथरूम मध्ये बाथरूमला गेली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीने ठेवलेली एका सिमेंट रंगाची हॅन्ड बॅग ज्यामध्ये १,५०,०००/— रू. ठेवलेले चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हावरे ब. नं. १५४६ मो. नं. ९९२२३३६५६२२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**